कविकुलगुरु - कालिदास - संस्कृत - विश्वविद्यालयः

This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit. The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

M 2228

Checked 2012

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
हस्तलिखित संग्रह

दाखल क्र. M2228 विषय धर्मशास्त्र

नाव श्रीसत्यनारायणपूजा सार्थक्रिया (मुद्रित)

लेखक / लिपीकार —

पृष्ठ 45 काळ — पूर्ण / ~~अपूर्ण~~

M-2228

प्रकाशक—[illegible]
मुद्रक—कृष्णराव विनायक सिनक[illegible] मि. मेस. [illegible] मुगभाट क्रासलेन मुंबई
आवृत्ति तिसरी] [प्रति[illegible]

[illegible] एकम[illegible] पपल्लव—आंबा, [illegible] ळि, [illegible] राचा पानें; पंचरत्नें (सोनें, रुपें, मोती, हिरा, [illegible]वळें.) केळीचे खांब मखरास, पुष्पमाळा, चौरंग किंवा पाट, विड्याचीं पानें १५, सुपाऱ्या ३०, बदाम २, खारका ३, नारळ १, पाट, सकलात, नैवेद्यास शिरा, महानैवेद्य, पूर्वोत्तरपूजेस दक्षणा १० आणे, पुराणिकास दक्षिणा ८ आठ आणे, भूयसी शक्त्यनुसार द्यावी. प्रसादाचें सामान सवाईचे मानानें असावें. (तूप, साखर, रवा, दूध व केळीं.)

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ऋषयचुः ॥ एकदानैमिषारण्येऋषयः
शौनकादयः ॥ पप्रच्छुर्मुनयःसर्वे सूतंपौराणिकंखलु ॥ १ ॥

एकदां नैमिष नांवाचे अरण्यांत शौनकादिक अनेक ऋषि सर्व पुराणवेत्ता जो सूत यास प्रश्न करिते झाले ॥ १ ॥

व्रतेनतपसाकिंवा [illegible] थय [illegible] सूत ॥ २ ॥

कीं, हे महाराज [illegible] फल [illegible] तें [illegible] श्रवण [illegible]

सूतउ० ॥ [illegible] तच्छृणुध्वंसमाहिताः ॥ ३ ॥

असा तो ऋषींचा प्रश्न ऐकून सूत म्हणतात [illegible] शौनकादिक ऋषीहो ! असा जो तुम्ही मला प्रश्न केलात, याप्रमाणेंच पूर्वीं नारदानें वैकुंठास जाऊन भगवान् लक्ष्मीपति विष्णूस प्रश्न केला. तेव्हां नारदास विष्णूनें जें कथन केलें तेंच मी तुम्हांस सांगतों. स्थिर मनानें श्रवण करा ॥ ३ ॥

एकदानारदोयोगीपरानुग्रहकांक्षया ॥ पर्यटन्विविधान्लोकान्मर्त्यलोकमुपागतः ॥ ४ ॥

एकदां नारदमुनि परोपकार इच्छेनें सर्व लोकांत फिरत असतां मृत्युलोकांत आले ॥ ४ ॥

गोविंदंगरुडध्वजं ॥ जनार्दनंजनातीतं[illegible]वल्लभंहरिं ॥ ४ ॥ प्रणमामिसदाभक्त्यानारायण मतःपरं ॥ दुर्गमेविषमेघोरेशत्रुभिःपरिपीडिते ॥ ५ ॥ निस्तारयस्वसर्वेषुतथानिष्टभयेषुच ॥ नामान्येतानिसंकीर्त्यईप्सितंफलमाप्नुयात् ॥ ६ ॥ सत्यनारायणंदेवंवंदेहंकामदंप्रभुं ॥ लीलया विततंविश्वंयेनतस्मैनमोनमः ॥ ७ ॥ [illegible] ॥ [illegible] तेनश्रीसत्यनारायणःप्रीयतां ॥ इतिसत्यना[illegible] नमः [illegible] ॥ [illegible] तगतजपापन[illegible] णमंत्रः ॥ [illegible] गृहीत्वाभक्तिभावतः ॥ सर्वान्कामानवाप्नु[illegible] ॥ [illegible] ॥ [illegible]

॥ इति श्रीसत्यनारायणपूजा समाप्ता ॥

ततोदृष्ट्वाजनान्सर्वान्नानाक्लेशसमन्वितान् ॥
नानायोनिसमुत्पन्नान्क्लिश्यमानान्स्वकर्मभिः ॥ ५ ॥
केनोपायेनचैतेषांदुःखनाशोभवेद्ध्रुवम् ॥ इतिसंचिंत्यमनसाविष्णुलोकंगतस्तदा ॥ ६ ॥

नंतर मृत्युलोकांतील सर्व प्राणिमात्र अनेक [illegible] युक्त व अनेक योनींत जन्म पावून अनेक प्रकारचीं दुःखें भोगितात, असें [illegible] जाईल असा मनांत विचार करून ते वैकुंठास गेले ॥ ५ ॥ [illegible]

तत्रनारायणंदेवंशुक्लवर्णंचतुर्भुजम् ॥ [illegible]मालाविभूषितम् ॥ ७ ॥
दृष्ट्वातंदेवदेवेशंस्तोतुंसमुपचक्रमे ॥ नार० ॥ नमोवाङ्मनसातीतरूपायानंतशक्तये ॥ ८ ॥
आदिमध्यांतहीनायनिर्गुणायगुणात्मने ॥ सर्वेषामादिभूतायभक्तानामार्तिनाशिने ॥ ९ ॥

आणि तेथें चतुर्भुज, शंख, चक्र, गदा, प आणि आपादलंबिनी वनमाला यांहींकरून विभूषित, सर्व देवांचा स्वामी, क्षीरसमुद्रीं वास करणारा जो विष्णु, त्यास अवलोकन करून ते नारदमुनि स्तुति करूं लागले कीं, हे नारायणा [illegible] निर्गुण असून भक्तांची पीडा दूर करण्या-

करितां व ह्या जगाची उत्पत्ति, स्थिति, प्रलय करण्याकरितां सगुण होतां; तसेंच आपण अनंतशक्ति आहांत ह्मणून आपलें स्वरूप वाणीला व मनाला अगोचर आहे, आणि आपणास आदि, मध्य व अंत नसून आपण सर्वांस आदिभूत आहांत, ह्मणून तुह्मांला माझा नमस्कार असो ॥ ७ ॥ ८ ॥ ९ ॥

श्रुत्वास्तोत्रंततोविष्णुर्नारदंप्रत्यभाषत ॥ श्रीभगवानुवाच ॥ किमर्थमाग
तोऽसित्वंकिंतेमनसिवर्तते ॥ [illegible]त्सर्वंकथयामिते ॥ १० ॥

[illegible] यादानें केलेली [illegible] कीं–हे नारदा, तूं येथें किमर्थ आळस व तुझ्या मनांत काय [illegible] कथन करितों ॥ १० ॥

नारदउ०॥मर्त्यलोकेजनाःसर्वेना[illegible]योनिसमुत्पन्नाः[illegible]पापकर्मभिः

हें ऐकून नारद ह्मणतात कीं, हे भगवान् ! मृत्युलोकांतील सर्व प्राणी पूर्वींच्या पापकर्मांनीं अनेक योनींत जन्म घेऊन पुढेंही पापकर्में करितात, यामुळें ते सर्वकाळ नानाप्रकारचीं दुःखें भोगितात ॥ ११ ॥

तत्कथंशमयेन्नाथलघूपायेनतद्वद ॥ श्रोतुमिच्छामितत्सर्वंकृपास्तियदितेमयि ॥ १२ ॥

तीं त्यांचीं सर्व दुःखें थोड्या उपायानें कशीं नाहींशीं होतील तें मला कथन करा. आपली कृपा मजवर आहे याकरितां तें सर्व मी ऐकण्याची इच्छा करितों ॥ १२ ॥

श्रीभगवानुवाच ॥ साधुपृष्टंत्वयावत्सलोकानुग्रहकांक्षया ॥
यत्कृत्वामुच्यतेमोहात्तच्छृणुष्ववदामिते ॥ १३ ॥

भगवान् ह्मणतात–नारदा ! लोकांवर अनुग्रह करावा या इच्छेनें तूं चांगलें विचारलेंस. याकरितां जें केलें असतां प्राणी सर्व दुःखांपासून मुक्त होतो तेंच साधन मी तुला सांगतों ऐक ॥ १३ ॥

व्रतमस्तिमहत्पुण्यंस्वर्गेमर्त्येचदुर्लभम् ॥ [illegible]प्रकाशःक्रियतेऽधुना ॥ [illegible] ॥

हे नारदा ! मोठें पुण्यकारक [illegible] तुझ्यावर माझी पूर्ण कृपा आहे ह्मणून आतां [illegible] ॥ १४ ॥

सत्यनारायणस्यैवंव्रतंसम्यक्विधानतः ॥ कृ[illegible]सुखंभुक्त्वापरत्रेमोक्षमाप्नुयात् ॥ [illegible] ॥

तें सत्यनारायणाचें व्रत होय. तें विधिविधानपूर्वक केलें असतां, तत्काळ प्राणी सर्व ऐहिक सुखाचा उपभोग घेऊन परलोकीं मोक्षातें पावतो ॥ १५ ॥

तच्छ्रुत्वाभगवद्वाक्यंनारदोमुनिरब्रवीत् ॥ श्रीनारदउवाच ॥ किंफलंकिं
विधानंचकृतंकेनैवतद्व्रतम् ॥ १६ ॥ तत्सर्वंविस्तराद्ब्रूहिकदाकार्यंहितद्व्रतम् ॥
श्रीभगवानुवाच ॥ दुःखशोकशमनंधनधान्यप्रवर्धनम् ॥ १७ ॥

भगवंताचें भाषण ऐकून नारदऋषि पुनःप्रश्न करितात-हे भगवन् ! त्या व्रताचें फल काय ? कसें करावें आणि केव्हां करावें ? व पूर्वी कोणी केलें हें सर्व मला विस्तारेंकरून सांगा. भगवान् ह्मणाले-हे नारदा ! हें व्रत दुःखशोकादिकांचा नाश आणि धनधान्याची वृद्धि करणारें आहे ॥ १६ ॥ १७ ॥

सौभाग्यसंततिकरंसर्वत्रविजयप्रदम् ॥ यस्मिन्कस्मिन्दिनेमर्त्योभक्तिश्रद्धासमन्वितः ॥ १८ ॥
सत्यनारायणंदेवंयजेचैवनिशामुखे ॥ [illegible]सहितोधर्मतत्परः ॥ [illegible] ॥

तसेंच सौभाग्य व संतति [illegible] विजय देणारें आ[illegible] ज्या दिवशीं मनुष्यास श्रद्धा व भक्ति उत्पन्न [illegible] व बांधव यांसहित (समक्ष) सत्यना[illegible] ॥ [illegible]

नैवेद्यंभक्तितोदद्यात्सपादंभक्ष्यमुत्तमम् ॥ रंभाफलघृतंक्षीरंगोधूमस्यचचूर्णकम् ॥ २० ॥
अभावेशालिचूर्णंवाशर्कराचगुडस्तथा ॥ सपादंसर्वभक्ष्याणिचैकीकृत्यनिवेदयेत् ॥ २१ ॥

त्यांत विशेष इतकेंच कीं-केळीं, तूप, दूध गव्हांचा रवा आणि साखर हे पांच पदार्थ सपाद (सवा शेर, सवा पायली) अशा मानानें एकत्र पक्वकरून तो नैवेद्य अर्पण करावा. गहूं न मिळाल्यास तांदूळ घ्यावे, साखरेच्या अभावीं गूळ घ्यावा ॥ २० ॥ २१ ॥

विप्रायदक्षिणांदद्यात्कथांश्रुत्वाजनैःसह ॥ ततश्चबंधुभिःसार्धंविप्रांश्चप्रतिभोजयेत् ॥ २२ ॥

सर्व लोकांसह कथा ऐकून ब्राह्मणांस दक्षिणा द्यावी. नंतर ब्राह्मण व बंधुवर्ग यांस भोजन घालावें ॥ २२ ॥

सपादंभक्षयेद्भक्त्यानृत्यगीतादिकंचरेत् ॥ ततश्चस्वगृहंगच्छेत्सत्यनारायणंस्मरन् ॥ २३ ॥

नंतर नृत्य व गायन करून तो सपाद नैवेद्य सर्वांस देऊन पश्चात् आपण भक्षण करावा. अशा प्रकारें हें व्रत नदीतीरादि पवित्रस्थळीं करून नंतर सत्यनारायणाचें स्मरण करीत घरीं यावें ॥ २३ ॥

एवंकृतेमनुष्याणांवांछासिद्धिर्भवेद्ध्रुवम् ॥ विशेषतःकलियुगेलघूपायोऽस्तिभूतले ॥ २४ ॥

सूत ह्मणतात-हे शौनकादि ऋषिहो ! या प्रकारेंकरून हें व्रत केलें असतां मनुष्याची मनकामना निश्चयकरून सिद्ध होईल. या मृत्युलोकीं तर या कलियुगांत हाच एक अल्प उपाय आहे ॥ २४ ॥

॥ इति श्रीस्कंदपुराणेरेवाखंडेसत्यनारायणकथायांप्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

अथान्यत्संप्रवक्ष्यामिकृतंयेनपुराद्विज ॥ कश्चित्काशीपुरेरम्येआसीद्विप्रोऽतिनिर्धनः ॥ १ ॥
क्षुत्तृड्भ्यांव्याकुलोभूत्वानित्यंबभ्रामभूतले ॥ दुःखितंब्राह्मणंदृष्ट्वाभगवान्ब्राह्मणप्रियः ॥ २ ॥
वृद्धब्राह्मणरूपस्तंपप्रच्छद्विजमादरात् ॥ किमर्थंभ्रमसेविप्रमहींनित्यंसुदुःखितः ॥ ३ ॥

या प्रकारेंकरून या व्रताचा काल व विधि सांगून पुन्हां भगवान् ह्मणतात-हें व्रत पूर्वी ज्यानें केलें

त्याचा इतिहास तुला सांगतों तो श्रवण कर. पूर्वी पुण्यकारक काशी क्षेत्रांत कोणी एक अतिदरिद्री ब्राह्मण होता. तो ब्राह्मण क्षुधा-तृषेनें व्याप्त होऊन नित्य त्या काशीक्षेत्रांतून फिरत असे. अशा त्या दुःखित ब्राह्मणास अवलोकन करून ब्राह्मणाविषयीं दयालु असे सत्यनारायण भगवान् वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेऊन मोठ्या आदरानें त्या ब्राह्मणास विचारितात कीं-हे ब्राह्मणा ! तूं दुःखित होऊन या भूतलावर नित्य किमर्थ भ्रमण करितोस ? ॥ १ ॥ २ ॥ ३ ॥

तत्सर्वंश्रोतुमिच्छामिकथ्यतांद्विजसत्तम ॥ ब्राह्मण
उवाच ॥ ब्राह्मणोऽतिदरिद्रोऽहंभिक्षार्थंवैभ्रमेमहीम ॥ ४ ॥

हें सर्व ऐकण्याची मला इच्छा आहे; तो [illegible] कथन कर. असें ऐकून तो दरिद्री ब्राह्मण म्हणाला कीं-हे द्विजश्रेष्ठा ! मी अत्यंत दरिद्री ब्राह्मण आहें. भिक्षा मागण्याकरितां पृथ्वीवर भ्रमण करीत असतों ॥ ४ ॥

उपायंयदिजानासिकृपयाकथयप्रभो ॥ वृद्धब्राह्मण-
उवाच ॥ सत्यनारायणोविष्णुर्वांछितार्थफलप्रदः ॥ ५ ॥

माझी भिक्षा सुटण्याजोगा कांहीं उपाय जर आपणांस माहित असेल तर तो कृपा करून सांगा. हें ऐकून श्रीभगवान् म्हणतात कीं-सत्यनारायणनामक जो विष्णु तो संपूर्ण मनोरथ पूर्ण करणारा आहे ॥ ५ ॥

तस्यत्वंपूजनंविप्रकुरुष्वव्रतमुत्तमम् ॥ यत्कृत्वासर्वदुःखेभ्योमुक्तोभवतिमानवः ॥ ६ ॥

त्याचें व्रत केलें असतां मनुष्य सर्व दुःखांपासून मुक्त होतो. याकरितां तूं त्याचेंच पूजनपूर्वक व्रत कर ॥ ६ ॥

विधानंचव्रतस्यापिविप्रायाभाष्ययत्नतः ॥ सत्यनारायणोवृद्धस्तत्रैवांतरधीयत ॥ ७ ॥

नंतर त्या व्रताचें नैवेद्यादिक सर्व विधान सांगून वृद्धब्राह्मणरूपी सत्यनारायण गुप्त झाले ॥ ७ ॥

तद्व्रतंसंकरिष्यामियदुक्तंब्राह्मणेनवै ॥ इतिसंचिंत्यविप्रोऽसौरात्रौनिद्रांनलब्धवान् ॥ ८ ॥

नंतर त्या ब्राह्मणानें विचार केला कीं-जें व्रत मला वृद्धब्राह्मणानें सांगितलें तेंच व्रत मी करीन. असा निश्चय करून तो ब्राह्मण निजला; परंतु व्रताचे [illegible]नेमुळें त्यास रात्रीं निद्रा लागली नाहीं ॥ ८ ॥

ततःप्रातःसमुत्थायसत्यनारायणव्रतम् ॥ करिष्यइतिसंकल्प्याभिक्षार्थमगमद्द्विजः ॥ ९ ॥

नंतर सकाळीं उठून आजच मी सत्यनारायणाचें व्रत करीन, असा संकल्प करून भिक्षेला गेला ॥ ९ ॥

तस्मिन्नेवदिनेविप्रःप्रचुरंद्रव्यमाप्तवान् ॥ तेनैवबंधुभिःसार्धंसत्यस्यव्रतमाचरत् ॥ १० ॥

त्या दिवशीं त्या दरिद्री ब्राह्मणाला पुष्कळच द्रव्य मिळालें. तेव्हां त्याच द्रव्यानें व्रताचें सर्व साहित्य सिद्ध करून आपले इष्ट, मित्र व ब्राह्मण बोलावून सत्यनारायणाचें यथाविधि व्रत केलें ॥ १० ॥

सर्वदुःखविनिर्मुक्तःसर्वसंपत्समन्वितः ॥ बभूवसद्द्विजश्रेष्ठोव्रतस्यास्यप्रभावतः ॥ ११ ॥

त्यामुळें तो सर्व दुःखांपासून मुक्त व सर्वसंपत्तियुक्त होऊन सकल ब्राह्मणांत श्रेष्ठ झाला ॥ ११ ॥

ततःप्रभृतिकालंचमासिमासिव्रतंकृतम् ॥ एवंनारायणस्येदंव्रतं
कृत्वाद्विजोत्तमः ॥ सर्वपापविनिर्मुक्तोदुर्लभंमोक्षमाप्तवान् ॥ १२ ॥

नंतर तो ब्राह्मण त्या दिवसापासून प्रतिमासास श्रीसत्यनारायणाचें व्रत करूं लागला. त्यामुळें तो निष्पाप होऊन अत्यंत दुर्लभ अशा मोक्षपदातें पावला ॥ १२ ॥

व्रतमस्ययदाविप्राःपृथिव्यांसंकरिष्यति ॥ तदैवसर्वंदुःखंचमनुजस्यविनश्यति ॥ १३ ॥

या करितां हे ऋषिहो ! पृथ्वीचे ठायीं जो कोणी हें व्रत करील त्याचें सर्व दुःख नाश पावेल ॥ १३ ॥

एवंनारायणेनोक्तंनारदायमहात्मने ॥ मयातत्कथितंविप्राःकिमन्यत्कथयामिवः ॥ १४ ॥

सूत ह्मणतात–हे ऋषिहो ! याप्रकारेंकरून पूर्वीं नारायणांनीं महात्म्या नारदास जें व्रत सांगितलें तेंच मी तुह्मांस कथन केलें. आतां दुसरें काय सांगूं तें कथन करा ॥ १४ ॥

ऋषयऊचुः ॥ तस्माद्विप्राच्छ्रुतंकेनपृथिव्यांचरितंमुने ॥
तत्सर्वंश्रोतुमिच्छामः श्रद्धाऽस्माकंप्रजायते ॥ १५ ॥

असें ऐकून पुनः शौनकादिऋषि ह्मणतात कीं–हे सूता ! हें व्रत त्या ब्राह्मणापासून कोणी ऐकिलें व कोणी केलें तें ऐकण्याची इच्छा आहे ॥ १५ ॥

सूत० ॥ शृणुध्वंमुनयःसर्वेव्रतंयेनकृतंभुवि ॥ एकदासद्विजवरोयथाविभवविस्तरैः ॥१६॥
बंधुभिःस्वजनैःसार्धंव्रतंकर्तुंसमुद्यतः ॥ एतस्मिन्नंतरेकालेकाष्ठक्रेतासमागमत् ॥ १७ ॥

असें त्या शौनकादिऋषींचें भाषण ऐकून सूत ह्मणतात कीं–भूतलाचे ठायीं पुढें हें व्रत कोणी केलें तो इतिहास ऐका. कोणे एके कालीं तो ब्राह्मणश्रेष्ठ आपले बंधू स्वजनांसहवर्तमान ऐश्वर्यानुरूप व्रत करण्यास सिद्ध झाला. इतक्या कालांत कोणी एक काष्ठें विकणारा तेथें प्राप्त झाला ॥ १६ ॥ १७ ॥

बहिःकाष्ठंचसंस्थाप्यविप्रस्यगृहमाययौ । तृष्णयापीडितात्माचदृष्ट्वाविप्रंकृतव्रतम् ॥ १८ ॥
प्रणिपत्यद्विजप्राहकिमिदंक्रियतेत्वया । कृतेकिंफलमाप्नोतिविस्तराद्वदमेप्रभो ॥ १९ ॥

आणि फार तहान लागली ह्मणून तो काष्ठभार बाहेर ठेऊन ब्राह्मणाचे घरांत गेला, तों तेथें ब्राह्मण व्रत करीत आहे, असें पाहून त्या ब्राह्मणाला नमस्कार करून ह्मणाला कीं–हे प्रभो ! तूं हें काय करितोस आणि हें केलें असतां काय फळ प्राप्त होतें, हें मला विस्तारानें कथन कर ॥ १८ ॥ १९ ॥

विप्र० ॥ सत्यनारायणस्येदंव्रतंसर्वेप्सितप्रदम् ॥
तस्यप्रसादान्मेसर्वंधनधान्यादिकंमहत् ॥ २० ॥

ब्राह्मण ह्मणाला कीं–हे शूद्रा ! हें सर्वांस इच्छित फळ देणारें सत्यनारायणाचें व्रत आहे आणि याच्याच प्रसादेंकरून मला हें बहुत सुतधान्यादिक सर्व ऐश्वर्य प्राप्त झालें ॥ २० ॥

तस्मादेतद्व्रतंज्ञात्वाकाष्ठक्रेताऽतिहर्षितः ॥ पपौजलंप्रसादंचभुक्त्वासनगरंययौ ॥ २१ ॥

असें त्या ब्राह्मणाचें भाषण व व्रताचा सर्व विधि ऐकून तो मोळीविक्या परम हर्षित झाला. नंतर जल प्राशन करून व प्रसाद भक्षण करून काष्ठें विकण्याकरितां नगरांत गेला ॥ २१ ॥

सत्यनारायणंदेवंमनसाइत्याचिंतयत् ॥ काष्ठंविक्रयतोग्रामेप्राप्यतेचाद्ययद्धनम् ॥ २२ ॥
तेनैवसत्यदेवस्यकरिष्येव्रतमुत्तमम् ॥ इतिसंचिंत्यमनसाकाष्ठंधृत्वातुमस्तके ॥ २३ ॥
जगामनगरेरम्येधनिनि यत्रसंस्थितिः ॥ तद्दिनेकाष्ठमूल्यंचद्विगुणंप्राप्तवानसौ ॥ २४ ॥

तेव्हां तो सत्यनारायण देवाविषयीं मनांत चिंतन करूं लागला कीं, आज ह्या गांवांत लांकडें विकून जें द्रव्य मिळेल तितक्याच द्रव्येंकरून मी सत्यनारायणाचें उत्तम व्रत करीन, असा आपल्या मनाशीं निश्चय करून तीं काष्ठें मस्तकावर घेऊन त्या नगरांत जेथें धनिक लोक राहत होते तेथें गेला; तो त्या दिवशीं त्याला त्या काष्ठाचें मूल्य दुप्पट मिळालें ॥ २२ ॥ २३ ॥ २४ ॥

ततःप्रसन्नहृदयःसुपक्वंकदलीफलम् ॥ शर्करा घृतदुग्धंचगोधूमस्यचचूर्णकम् ॥ २५ ॥

नंतर तो आनंदित होऊन पिकलेलीं केळीं, साखर, दूध, तूप, आणि गव्हांचा रवा ॥ २५ ॥

कृत्वैकत्रसपादंचगृहीत्वास्वगृहंययौ ॥ ततोबंधूनसमाहूयचकारविधिनाव्रतम् ॥ २६ ॥

हे पदार्थ सवाई प्रमाणानें घेऊन घरीं आला. नंतर इष्टमित्रांस बोलावून यथाविधि पूजन केलें ॥ २६ ॥

तद्व्रतस्यप्रभावेणधनपुत्रान्वितोऽभवत् ॥ इहलोकेसुखंभुक्त्वाचांतेसत्यपुरंययौ ॥ २७ ॥

त्या व्रतप्रभावानें त्याला संपत्ती व संतति आदि ऐहिक सौख्य मिळून अंतीं सत्यपुरास गेला ॥ २७ ॥

॥ इतिश्रीस्कंदपुराणेरेवाखंडेसत्यनारायणकथायांद्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

सूतउवाच ॥ पुनरग्रेप्रवक्ष्यामिशृणुध्वंमुनिसत्तमाः ॥
पुराचोल्कामुखोनामनृपश्चासीन्महीपतिः ॥ १ ॥
जितेंद्रियःसत्यवादीययौदेवालयंप्रति ॥ दिनेदिनेधनंदत्वाद्विजान्संतोषयन्सुधीः ॥ २ ॥

सूत ह्मणतात—हे ऋषिश्रेष्ठहो ! पुनः या व्रताविषयीं एक इतिहास सांगतों तो ऐका. पूर्वीं उल्कामुख या नामेंकरून एक पृथ्वीपालक राजा होता ॥ १ ॥ तो बुद्धिवान, सत्यवादी, जितेंद्रिय असून प्रतिदिवशीं देवालयांत जाऊन ब्राह्मणांस द्रव्य देऊन त्यांना संतोषित करित असे ॥ २ ॥

भार्यातस्यप्रमुग्धाचसरोजवदनासती ॥ भद्रशीलानदीतीरेसत्यस्यव्रतमाचरत् ॥ ३ ॥

त्याची भद्रशीला नामक सुंदर स्त्री कमलासारख्या मुखानें सुशोभित असून पतिव्रता होती; त्या स्त्रीसहवर्तमान तो राजा एके दिवशीं नदीतीरीं सत्यनारायणाचें व्रत करीत होता ॥ ३ ॥

एतस्मिन्नंतरेकालेसाधुरेकःसमागतः ॥ वाणिज्यार्थंबहुधनैरनेकैःपरिपूरितः ॥ ४ ॥

इतक्यांत तेथें एक साधु नांवाचा वाणी व्यापाराकरितां बहुमूल्य अशा अनेक वस्तु घेऊन आला ॥४॥

नावंसंस्थाप्यतत्तीरेजगामनृपतिंप्रति ॥ दृष्ट्वासव्रतिनंभूपंपप्रच्छविनयान्वितः ॥ ५ ॥

आणि त्या नदीतीरीं आपली नौका लावून त्या राजाजवळ गेला आणि तो राजा कांहीं व्रत करीत आहे असें अवलोकन करून नम्र होऊन त्यास विचारतो कीं–॥ ५ ॥

किमिदंकुरुषेराजन्भक्तियुक्तेनचेतसा ॥ प्रकाशंकुरुतत्सर्वंश्रोतुमिच्छामिसांप्रतम् ॥ ६ ॥

हे राजन् ! आपण हें भक्तिपूर्वक काय करतां तें मी ऐकूं इच्छितों, तरी सर्व मला सांगा ॥ ६ ॥

राजोवाच ॥ पूजनंक्रियतेसाधोविष्णोरतुलतेजसः ॥
व्रतंचस्वजनैःसार्धंपुत्राद्यावाप्तिकाम्यया ॥ ७ ॥

सूत ह्मणतात–असें त्या वैश्याचें भाषण ऐकून राजा ह्मणाला कीं, हे साधो ! अतुल तेजस्वी जो विष्णु त्याचें हें व्रत पुत्रादिक प्राप्त व्हावे अशा इच्छेनें ह्या स्वजनांसहवर्तमान मी करितों ॥ ७ ॥

भूपस्यवचनंश्रुत्वासाधुःप्रोवाचसादरम् ॥ सर्वंकथयमेराजन्करिष्येऽहंतवोदितम् ॥ ८ ॥

असें राजाचें भाषण ऐकून तो साधूवाणी पुनः नम्रतेनें ह्मणतो कीं–हे राजन् ! या व्रताचा सर्व प्रकार मला कथन कर ह्मणजे तूं सांगितलेलें व्रत मीही करीन ॥ ८ ॥

ममापिसंततिर्नास्तिएतस्माज्जायतेध्रुवम् ॥ ततोनिवृत्यवाणिज्यात्सानंदोगृहमागतः ॥ ९ ॥

कारण मलाही संतति नाहीं, आणि या व्रतापासून ती निश्चयात्मक होते; असें बोलून त्या राजापासून व्रत विचारून तो व्यापारापासून परावृत्त होऊन आनंदानें घरीं आला ॥ ९ ॥

भार्यायैकथितंसर्वंव्रतंसंततिदायकम् ॥ तदाव्रतंकरिष्यामियदामेसंततिर्भवेत् ॥ १० ॥
इतिलीलावतींप्राहपत्नींसाधुःससत्तमः ॥ एकस्मिन्दिवसेतस्यभार्यालीलावतीसती ॥ ११ ॥
भर्तृयुक्तानंदचित्ताभवद्धर्मपरायणा ॥ गर्भिणीचाभवत्तस्यभार्यासत्यप्रसादतः ॥ १२ ॥

आणि संतति देणारें तें व्रत, त्याचा विधि व आपणास संतति होतांच व्रत करण्याचा केलेला संकल्प इत्यादि सर्व प्रकार त्या साधुवाण्यानें आपल्या लीलावतीनामक स्त्रियेला कथन केला. नंतर एके दिवशीं त्या साधुवाण्याची ती लीलावतीनामक महापतिव्रता स्त्री पतिधर्माविषयीं तत्पर होऊन आनंदयुक्त अंतःकरणानें आपल्या भर्त्याशीं रममाण झाली आणि त्या सत्यनारायणाचे प्रसादें करून तत्काल गरोदर झाली ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥

दशमेमासिवैतस्याःकन्यारत्नमजायत ॥ दिनेदिनेसाववृधेशुक्लपक्षेयथाशशी ॥ १३ ॥

पुढें दहाव्या महिन्यांत तिला एक कन्या झाली. नंतर ती कन्या शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें वाढूं लागली ॥ १३ ॥

नाम्नाकलावतीचेतितन्नामकरणंकृतम् ॥ ततोलीलावतीप्राहस्वामिनंमधुरंवचः ॥ १४ ॥

नंतर तिचें नांव कलावती असें ठेविलें. पुढें लीलावती आपल्या पतीला मधुरभाषणानें ह्मणाली ॥ १४ ॥

नकरोषिकिमर्थंवैपुरासंकल्पितंव्रतम् ॥ साधुउवाच ॥
विवाहसमयेत्वस्याःकरिष्यामिव्रतंप्रिये ॥ १५ ॥ ॥

आपण पूर्वीं नवस केलेलें व्रत अद्यापि कां करीत नाहीं ? असें स्त्रीचें भाषण ऐकून तो साधुवाणी ह्मणतो कीं—हे प्रिये ! हिच्या विवाहकालीं तें व्रत मी करीन ॥ १५ ॥

इतिभार्यांसमाश्वास्यजगामनगरंप्रति ॥ ततःकलावतीकन्याववृधेपितृवेश्मनि ॥ १६ ॥

असें त्या स्त्रीचें समाधान करून तो साधुवाणी कामाकरितां नगरांत गेला. ती कलावती कन्या बापाचे घरीं वृद्धिंगत होत चालली ॥ १६ ॥

दृष्ट्वाकन्यांततःसाधुर्नगरेसाखिभिःसह ॥ मंत्रयित्वाद्रुतंदूतंप्रेषयामासधर्मवित् ॥ १७ ॥

एके दिवशीं त्या धर्मज्ञ साधुवाण्यानें आपल्या कन्येला अवलोकन करून तिच्या विवाहाविषयीं आपल्या सर्व मित्रांसहवर्तमान विचार करून एक दूत पाठविला ॥ १७ ॥

विवाहार्थंचकन्यायावरं श्रेष्ठंविचारय ॥ तेनाज्ञप्तश्चदूतोसौकांचनंनगरंययौ ॥ १८ ॥

त्याकालीं त्या दूताला सांगितलें कीं—हे दूता ! माझ्या कन्येला योग्य असा वर पहा. अशी साधुवाण्याची आज्ञा घेऊन तो दूत वर पहात कांचननामें नगरांत गेला ॥ १८ ॥

तस्मादेकंवणिक्पुत्रंसमादायागतोह्यसौ ॥ दृष्ट्वातुसुंदरंबालंवणिक्पुत्रंगुणान्वितम् ॥ १९ ॥

तेथें सर्वगुणसंपन्न असा एक वैश्यपुत्र पाहून त्यास बरोबर घेऊन त्या साधुवाण्याजवळ आला. तेव्हां त्यानें सर्व गुणांनीं युक्त, रूपानें सुंदर व तरुण अशा त्या वैश्यपुत्रास अवलोकन करून ॥ १९ ॥

ज्ञातिभिर्बंधुभिःसार्धंपरितुष्टेनचेतसा । दत्तवान्साधुःपुत्रायकन्यांविधिविधानतः ॥ २० ॥
ततोभाग्यवशात्तेनविस्मृतंव्रतमुत्तमम् । विवाहसमयेतस्यास्तेनरुष्टोऽभवत्प्रभुः ॥ २१ ॥

आपल्या ज्ञातिबांधवांसमक्ष ती आपली कन्या त्या वैश्यपुत्रास विधानपूर्वक दिली. पुढें त्या कन्येच्या विवाहकालीं आपल्या ऐश्वर्यांत निमग्न असल्यामुळें त्या साधुवाण्याला व्रत करण्याचें विस्मरण झालें, तेणेंकरून प्रभु सत्यनारायण रुष्ट झाले ॥ २० ॥ २१ ॥

ततःकालेननियतोनिजकर्मविशारदः॥वाणिज्यार्थंगतःशीघ्रंजामात्रासहितोवणिक्॥२२॥

काहीं दिवसांनीं साधुवाणी जांवयासह व्यापारासाठीं त्वरेनें दूरदेशीं निघून गेला ॥ २२ ॥

रत्नसारपुरेरम्येगत्वासिंधुसमीपतः॥ वाणिज्यमकरोत्साधुर्जामात्राश्रीमतासह ॥ २३ ॥

तो समुद्रकांठच्या सुंदर रत्नसार नगरांत जाऊन जांवयासहवर्तमान व्यापार करूं लागला ॥ २३ ॥

तौगतौनगरेरम्येचंद्रकेतोर्नृपस्यच । एतस्मिन्नेवकालेतुसत्यनारायणःप्रभुः ॥ २४ ॥

या प्रकारेंकरून ते उभयतां चंद्रकेतु राजाच्या त्या रत्नसारनामक रम्य नगरांत व्यापार करण्याकरितां गेले; इतक्या काळांतच प्रभु सत्यनारायणानें ॥ २४ ॥

भ्रष्टप्रतिज्ञमालोक्यशापंतस्मैप्रदत्तवान् ॥ दारुणंकठिनंचास्यमहद्दुःखंभविष्यति ॥ २५ ॥

हा साधुवाणी प्रतिज्ञाभ्रष्ट आहे असें पाहून त्यास शाप दिला कीं, याला कठिण व भयंकर असें मोठें दुःख प्राप्त होईल ॥ २५ ॥

एकस्मिन्दिवसेराज्ञोधनमादायतस्करः॥ तत्रैवचागतश्चोरोवणिजौयत्रसंस्थितौ ॥ २६ ॥

असा शाप होतांच एके दिवशीं काहीं चोर त्या चंद्रकेतुराजाचें द्रव्य चोरून जेथें ते वैश्य रहात होते तेथें आले ॥ २६ ॥

तत्पश्चाद्धावकान्दूतान्दृष्ट्वाभीतेनचेतसा ॥ धनंसंस्थाप्यतत्रैवसतुशीघ्रमलक्षितः ॥ २७ ॥

इतक्यांत आपल्या मागून राजदूत धांवत येतात असें पाहून भयाभीत होऊन तें द्रव्य जेथें साधुवाणी होता तेथें टाकून पळाले ॥ २७ ॥

ततोदूताःसमायातायत्रास्तेसज्जनोवणिक् ॥ दृष्ट्वानृपधनंतत्रबद्ध्वादूतैर्वणिक्सुतौ ॥ २८ ॥

नंतर जेथें तो सज्जन साधुवाणी रहात होता तेथें ते राजदूत आले आणि तें राजद्रव्य अवलोकन करून त्या उभयतां वणिकपुत्रांस बंधन करून ॥ २८ ॥

हर्षेणधावमानाश्चऊचुर्नृपसमीपतः ॥ तस्करौद्वौसमानीतौविलोक्याज्ञापयप्रभो ॥ २९ ॥

हर्षानें धांवत राजाजवळ आले आणि म्हणाले कीं—हे राजा ! दोन चोर आम्हीं आणिले आहेत यांना अवलोकन करून आम्हांस आज्ञा करा ॥ २९ ॥

राज्ञाज्ञप्तास्ततःशीघ्रंदृढंबद्ध्वातुतावुभौ ॥ स्थापितौद्वौमहादुर्गेकारागारेऽविचारतः॥ ३० ॥

पुढें राजाज्ञेनें दूतांनीं उभयतां वाण्यांस दृढ बंधन करून कारागृहांत टाकिलें ॥ ३० ॥

माययासत्यदेवस्यनश्रुतंकैस्तयोर्वचः ॥ अतस्तयोर्धनंराज्ञागृहीतंचंद्रकेतुना ॥ ३१ ॥

सत्यनारायणाच्या मायेनें सर्व मोहित झाल्यामुळें त्या उभयतांचें भाषण कोणीही श्रवण केलें नाहीं; आणि हे चोर आहेत ह्मणून चंद्रकेतु राजानें यांचें द्रव्यही हरण केलें ॥ ३१ ॥

तच्छापाच्चगृहेतस्यभार्याचैवातिदुःखिता ॥ अन्नचिंतापराभूत्वाबभ्रामचगृहेगृहे ॥ ३२ ॥

तसेंच त्याच्या शापेंकरून त्याच्या घरचें द्रव्यही चोरांनीं हरण केलें, त्यामुळें त्याच्या स्त्रीला अतिदुःख झालें ॥ ३२ ॥

आधिव्याधिसमायुक्ताक्षुत्पिपासातिदुःखिता ॥ अन्नचिंतापराभूत्वाबभ्रामचगृहेगृहे ॥ ३३ ॥

आणि तिच्या मनाला व शरीराला पीडा होऊन क्षुधा व तृषा यांनीं ती फार दुःखित झाली, आणि अन्नाविषयीं चिंताग्रस्त होऊन ती घरोघरीं भिक्षा मागण्याकरितां फिरूं लागली ॥ ३३ ॥

कलावतीतुकन्यापिबभ्रामप्रतिवासरम् ॥ एकस्मिन्दिवसेजाता
क्षुधार्ताद्विजमंदिरम् ॥ गत्वापश्यद्व्रतंतत्रसत्यनारायणस्यच ॥ ३४ ॥

तशीच त्याची कलावतीनामें कन्याही प्रतिदिवशीं भिक्षा मागण्याकरितां फिरे. एके दिवशीं ती कन्या क्षुधाक्रांत झाली आणि ब्राह्मणाचे घरीं जाऊन पहाते तों तेथें सत्यनारायणाचें व्रत चाललें आहे ॥ ३४ ॥

उपविश्यकथांश्रुत्वावरंप्रार्थितवत्यपि ॥ प्रसादभक्षणंकृत्वाययौरात्रौगृहंप्रति ॥ ३५ ॥

तेव्हां ती तेथें बसून कथा ऐकून प्रसाद भक्षण करून सत्यनारायणाची इच्छित फलाविषयीं प्रार्थना करून घरीं आली ॥ ३५ ॥

माताकलावतींकन्यांपृच्छयामासप्रेमतः ॥ पुत्रिरात्रौस्थिताकुत्रकिंतेमनसिवर्तते ॥ ३६ ॥

तेव्हां तिच्या आईनें प्रेमानें विचारलें कीं—आज इतकी रात्रपर्यंत कोठें होतीस, व तुझ्या मनांत काय आहे? ३६

कन्याकलावतीप्राहमातरंप्रतिसत्वरम् ॥ द्विजालयेव्रतंमातर्दृष्टंवांछितसिद्धिदम् ॥ ३७ ॥

असें मातुश्रीचें भाषण ऐकून कलावती कन्या ह्मणते कीं—हे मातोश्री ! ब्राह्मणाचे घरीं निश्चयेंकरून इच्छित फल देणारें सत्यनारायणाचें व्रत होतें ह्मणून मला घरीं येण्यास रात्र झाली ॥ ३७ ॥

तच्छ्रुत्वाकन्यकावाक्यंव्रतंकर्तुंसमुद्यता ॥ सामुदातुवणिग्भार्यासत्यनारायणस्यच ॥ ३८ ॥
व्रतंचक्रेसैवसाध्वीबंधुभिःस्वजनैःसह ॥ भर्तृजामातरौक्षिप्रमागच्छेतांस्वमाश्रमम् ॥ ३९ ॥

असें कन्येचें भाषण ऐकून लीलावती सत्यनारायणाचें व्रत करण्यास सिद्ध झाली. नंतर ती साध्वी साधुवाण्याची स्त्री आपल्यां बंधुस्वजनांसहवर्तमान आनंदानें व्रत करून प्रार्थना करिती झाली कीं—हे

सत्यनारायणा ! माझा पति व जांवई हे लौकर घरीं येवोत ॥ ३८ ॥ ३९ ॥

अपराधंचमेभर्तृर्जामातुःक्षंतुमर्हसि ॥ इतिदिव्यंवरंवव्रेसत्यदेवं
पुनःपुनः ॥ व्रतेनानेनतुष्टोऽसौसत्यनारायणःप्रभुः ॥ ४० ॥

आणि माझा पती व जांवई यांच्या उभयतांच्या अपराधांची क्षमा करण्यास आपणच योग्य आहांत. असें बोलून नारायणास उत्तम वराविषयीं प्रार्थूं लागली, तेव्हां त्या व्रतेंकरून प्रभु नारायण संतुष्ट झाले ॥४०॥

दर्शयामासस्वप्नंहिचंद्रकेतुंनृपोत्तमम् ॥ बंदिनौमोचयप्रातर्वणिजौनृपसत्तम ॥ ४१ ॥

तेव्हां चंद्रकेतु राजाचे स्वप्नांत जाऊन ह्मणाले कीं–हे नृपश्रेष्ठा ! तूं जे दोन वाणी बंदींत टाकिले आहेस त्या उभयतांना प्रातःकाळीं सोड ॥ ४१ ॥

देयंधनंचतत्सर्वंगृहीतंयत्त्वयाऽधुना ॥ नोचेत्वांनाशयिष्यामिसराज्यधनपुत्रकम् ॥ ४२ ॥
एवमाभाष्यराजानंध्यानगम्यौऽभवत्प्रभुः ॥ ततःप्रभातसमयेराजाचस्वजनैःसह ॥ ४३ ॥

आणि त्यांचें द्रव्य जें पूर्वीं हरण केलेंस तें सर्व सांप्रत त्यांस दे. असें जर न करशील तर तुझें राज्य व द्रव्य पुत्रादिक यासहवर्तमान मी तुझा नाश करीन. असें त्या राजास बोलून भगवान् गुप्त झाले. नंतर राजानें प्रातःकाळींच उठून आपल्या स्वजनांसहवर्तमान ॥ ४२ ॥ ४३ ॥

उपविश्यसभामध्येप्राहस्वप्नंजनंप्रति ॥ बद्धौमहाजनौशीघ्रंमोचयद्वौवणिक्सुतौ ॥ ४४ ॥

सभेंत बसून आपलें स्वप्न सर्वांस सांगितलें व कारागृहांत टाकिलेल्या दोघां महाजन वैश्यपुत्रांस सोडा अशी दूतांस आज्ञा केली ॥ ४४ ॥

इतिराज्ञावचःश्रुत्वामोचयित्वामहाजनौ ॥ समानीतौनृपस्याग्रेप्राहुस्तेविनयान्विताः॥४५॥

राजाज्ञा ऐकतांच त्या वाण्यांस कारागृहांतून काढून राजासमोर आणून ते दूत नम्रतेनें ह्मणतात कीं–॥४५॥

आनीतौद्वौवणिक्पुत्रौमुक्तौनिगडबंधनात् ॥ ततौमहाजनौनत्वाचंद्रकेतुंनृपोत्तमम् ॥४६॥

हे राजन् ! आपल्या आज्ञेप्रमाणें हे दोन वैश्य कारागृहांतून मुक्त करून आणले आहेत. असें दूतांनीं सांगितल्यानंतर त्या उभयतां वैश्यांनीं चंद्रकेतु राजास नमस्कार करून ॥ ४६ ॥

स्मरंतौपूर्ववृत्तांतंनोचतुर्भयविव्हलौ ॥ राजावणिक्सुतौवीक्ष्यवचःप्रोवाचसादरम् ॥ ४७॥

आपल्या पूर्ववृत्तांताचें स्मरण करून भयानें विव्हळ होऊन कांहीं न बोलतां स्तब्ध राहिले; तेव्हां राजा त्या वैश्यपुत्रांस अवलोकन करून आदरानें भाषण करिता झाला कीं– ॥ ४७ ॥

दैवात्प्राप्तंमहद्दुःखमिदानींनास्तिवैभयम् ॥ तदानिगडसंत्यागंक्षौरकर्माद्यकारयत् ॥ ४८ ॥

वस्त्रालंकारकंदत्त्वापरितोष्यनृपश्चतौ ॥ पुरस्कृत्यवणिक्पुत्रौवचसातोषयद्भृशम् ॥ ४९ ॥

हे वैश्यहो ! तुह्मांस जें दुःख प्राप्त झालें तें तुमच्या केवळ प्रारब्धानेंच झालें; परंतु सांप्रत तुह्मांस कांहींच भय नाहीं. असें भाषण करून सत्कार करण्याकरितां त्यांचें क्षौरकर्म व मंगलस्नानादिक करवून राजानें त्यांस वस्त्रालंकार देऊन संतोषित करून नंतर सन्मानकारक भाषणांनींही संतुष्ट केलें ॥ ४८ ॥ ४९ ॥

पुरातनीतुयद्द्रव्यंद्विगुणीकृत्यदत्तवान् ॥ प्रोवाचतौततोराजागच्छसाधोनिजाश्रमम् ॥ ५० ॥

आणि पूर्वीं घेतलेल्याचें दुप्पट द्रव्य त्याला दिलें व नंतर घरीं जाण्यास आज्ञा दिली ॥ ५० ॥

राजानंप्रणिपत्याहुर्गंतव्यंत्वत्प्रसादतः ॥ ५१ ॥

हें ऐकून ते वैश्य राजास नमस्कार करून ह्मणाले–हे राजन् ! आपल्या प्रसादानें आह्मीं जातों ॥ ५१ ॥

इतिश्रीस्कंदपुराणेरेवाखंडेसत्यनारायणकथायांतृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

सू० ॥ यात्रांतुकृतवान्साधुर्मंगलायनपूर्विकाम् ॥ ब्राह्मणायधनंदत्वातदातुनगरंययौ ॥ १ ॥

सूत ह्मणतात–हे शौनकादिक ऋषिहो ! त्याकाळीं तो साधुवाणी मंगलकारक कृत्यें करून निघतेवेळीं ब्राह्मणांस द्रव्य देऊन आपल्या रत्नपुरी नामक नगरास जाण्याकरितां निघाला ॥ १ ॥

कियद्दूरेगतेसाधौसत्यनारायणःप्रभुः ॥ जिज्ञासांकृतवान्साधोकिमस्तितवनौस्थितम् ॥ २ ॥

तो कांहीं दूर जातांच प्रभु सत्यनारायण संन्याशाच्या वेषानें त्याच्याजवळ येऊन आपलें स्मरण आहे किंवा नाहीं हें पाहण्याकरितां त्यास ह्मणाले कीं–हे साधो ! तुझ्या नौकेंत काय भरलें आहे ? ॥ २ ॥

ततोमहाजनौमत्तौहेलयाचप्रहस्यवै ॥ कथंपृच्छसिभोदंडिन्मुद्रांनेतुंकिमिच्छसि ॥ ३ ॥

असें विचारितांच मदोन्मत्त वैश्य त्याची तिरस्कारपूर्वक थट्टा करून हंसून ह्मणाले कीं–हे संन्याशा ! तूं कशाकरितां विचारतोस ? कांहीं द्रव्य नेण्याची इच्छा आहे काय ? ॥ ३ ॥

लतापत्रादिकंचैववर्ततेतरणौमम ॥ निष्ठुरंचवचःश्रुत्वासत्यंभवतुतेवचः ॥ ४ ॥

परंतु ह्या आमच्या नौकेंत द्रव्य नसून केवळ वेली व पानें भरलीं आहेत. असें त्या साधुवाण्याचें निष्ठुर भाषण ऐकून तो संन्यासी ह्मणाला कीं–हे साधो ! हेंच तुझें भाषण सत्य होवो ॥ ४ ॥

एवमुक्त्वागतःशीघ्रंदंडीतस्यसमीपतः ॥ कियद्दूरेततोगत्वास्थितःसिंधुसमीपतः ॥ ५ ॥
गतेदंडिनिसाधुश्चकृतनित्यक्रियस्तदा ॥ उत्थितांतरणींदृष्ट्वाविस्मयंपरमंययौ ॥ ६ ॥

असें त्या साधुवाण्यास बोलून तो संन्यासी तत्काळ त्याचे जवळून गेला आणि कांहीं दूर अंतरावर

जाऊन समुद्राचे तीरीं बसला. तो संन्यासी गेल्यानंतर तो साधुवाणी स्नानसंध्यादि नित्य कृत्य करून आपली नौका हलकी झालेली पाहून परम आश्चर्य पावला ॥ ५ ॥ ६ ॥

दृष्ट्वालतादिकंचैवमूर्छितोन्यपतद्भुवि ॥ लब्धसंज्ञोवणिक्पुत्रस्ततश्चिंतान्वितोऽभवत् ॥७॥

आणि नौकेंत सर्व वेली व पानें पाहून द्रव्यमोहानें मूर्च्छित होऊन पृथ्वीवर पडला. नंतर कांहीं वेळानें सावध होऊन चिंताक्रांत झाला ॥ ७ ॥

तदातुदुहितुःकांतोवचनंचेदमब्रवीत् ॥ किमर्थंक्रियतेशोकःशापोदत्तश्चदंडिना ॥ ८ ॥

तेव्हां जांवई ह्मणतो कीं–शोक कशाला करितां ? आपणाला त्या संन्याशानें शाप दिला ॥ ८ ॥

शक्यतेऽनेनसर्वंहिकर्तुंचात्रनसंशयः ॥ अतस्तच्छरणंयामोवांछितार्थोभविष्यति ॥ ९ ॥

तेव्हां तो संन्याशी सर्व कांहीं करण्यास समर्थ आहे यांत संशय नाहीं, या करितां आपण त्यालाच शरण जाऊं ह्मणजे आपला मनोरथ पूर्ण होईल ॥ ९ ॥

जामातुर्वचनंश्रुत्वातत्सकाशंगतस्तदा ॥ दृष्ट्वाचदंडिनंभक्त्यानत्वाप्रोवाचसादरम् ॥ १० ॥

असें जांवयाचें भाषण ऐकून तत्काल तो साधुवाणी त्या संन्याशाजवळ गेला आणि त्यास भक्तीनें

नमस्कार करून आदरपूर्वक ह्मणतो कीं– ॥ १० ॥

क्षमस्वचापराधंमेयदुक्तंतवसंनिधौ ॥ एवंपुनःपुनर्नत्वामहाशोकाकुलोऽभवत् ॥ ११ ॥

हे स्वामिन् ! मी आपल्याजवळ जें खोटें बोललों त्या अपराधाची क्षमा करा. असें त्या संन्याशास बोलून वारंवार नमस्कार करून तो साधुवाणी शोकानें अत्यंत व्याकूळ झाला ॥ ११ ॥

प्रोवाचवचनंदंडीविलपंतंविलोक्यच ॥ मारोदीःशृणुमद्वाक्यंममपूजाबहिर्मुखः ॥ १२ ॥

नंतर तो साधुवाणी फार शोकग्रस्त झाला असें पाहून त्यास तें संन्यासवेषधारी सत्यनारायण ह्मणतात कीं–हे साधोवाण्या ! तूं रडूं नकोस, माझें भाषण ऐक. तूं माझी पूजा केली नाहींस ॥ १२ ॥

ममाज्ञयाचदुर्बुद्धेलब्धंदुःखंमुहुर्मुहु ॥ तच्छ्रुत्वाभगवद्वाक्यंस्तुतिंकर्तुंसमुद्यतः ॥ १३ ॥

ह्मणून हे दुर्बुद्धे ! माझ्याच आज्ञेनें तुला वारंवार दुःख प्राप्त झालें. असें तें भगवंताचें भाषण ऐकून साधुवाणी स्तुति करण्यास उद्युक्त झाला ॥ १३ ॥

साधुरुवाच ॥ त्वन्मायामोहिताःसर्वेब्रह्माद्यास्त्रिदिवौकसः ॥
नजानंतिगुणानूरूपंतवाश्चर्यमिदंप्रभो ॥ १४ ॥

आणि ह्मणतो कीं—हे प्रभो ! तुमच्या मायेनें ब्रह्मदेव आदिकरून सर्व देव मोहित झाले ह्मणून ते ब्रह्मदेवादि देवही तुमचें आश्चर्यकारक स्वरूप व गुण यांस जाणत नाहींत ॥ १४ ॥

मूढोऽहंत्वांकथंजानेमोहितस्तवमायया ॥ प्रसीदपूजयिष्यामियथाविभवविस्तरैः ॥ १५ ॥

आणि मी तर मूर्ख असून तुमच्या मायेनें मोहित झालों आहें. तेव्हां तुह्मांस कसें जाणूं ? याकरितां झालेल्या अपराधाची क्षमा करा आणि प्रसन्न व्हा. मी ऐश्वर्यानुरूप आपली पूजा करीन ॥ १५ ॥

पुरावित्तंचतत्सर्वंत्राहिमांशरणंगतम् ॥ श्रुत्वाभक्तसुतंवाक्यंपरितुष्टोजनार्दनः ॥ १६ ॥

परंतु मी आपणांस शरण आलों आहें, यास्तव पूर्वीचें द्रव्य मला देऊन माझें रक्षण करा. असें त्या साधुवाण्याचें भक्तियुक्त भाषण ऐकून दुष्टजनांस पीडा देणारे भगवान् संतुष्ट झाले ॥ १६ ॥

वरंचवांछितंदत्वातत्रैवांतर्दधेहरिः ॥ ततोनावंसमारुह्यदृष्ट्वावित्तप्रपूरिताम् ॥ १७ ॥

आणि तुझें द्रव्य तुला प्राप्त होईल, असा त्या साधुवाण्याला इच्छित वर देऊन सत्यनारायण प्रभु तेथेंच गुप्त झाले. नंतर साधुवाणी त्या नौकेवर चढून आपली नौका पूर्ववत् भरली आहे असें अवलोकन करून ह्मणतो कीं– ॥ १७ ॥

कृपयासत्यदेवस्यसफलंवांछितंमम ॥ इत्युक्त्वास्वजनैःसार्धंपूजांकृत्वायथाविधि ॥ १८ ॥

सत्यनारायणाच्या कृपेंकरून माझें इच्छित सफल झालें, असें बोलून तो साधुवाणी आपल्या स्वजनांसहवर्तमान सत्यनारायणाची पूजा करून ॥ १८ ॥

हर्षेणचाभवत्पूर्णःसत्यदेवप्रसादतः ॥ नावंसंयोज्ययत्नेनस्वदेशगमनंकृतम् ॥ १९ ॥

त्याच्या कृपेनें आनंदित होऊन नंतर नौकेंत बसून आपल्या देशास गेला ॥ १९ ॥

साधुर्जामातरंप्राहपश्यरत्नपुरींमम ॥ दूतंचप्रेषयामासनिजवित्तस्यरक्षकम् ॥ २० ॥

नंतर कांहीं वेळानें तो साधुवाणी आपल्या नगराजवळ पोहोंचला, तेव्हां जांवयास ह्मणाला कीं, हें पहा माझें नगर ! असें भाषण करून त्यानें आपल्या द्रव्य रक्षण करणाऱ्या दूतास घरीं पाठविलें ॥ २० ॥

दूतोऽसौनगरंगत्वासाधुभार्यांविलोक्यच ॥ प्रोवाचवांछितंवाक्यंनत्वाबद्धांजलिस्तदा ॥ २१ ॥

नंतर दूतानें रत्नपुरीनामक नगरांत जाऊन त्या साधुवाण्याचे स्त्रियेस अवलोकन केलें आणि तत्काल तीस नमस्कार करून हात जोडून तिला प्रिय असें भाषण केलें ॥ २१ ॥

निकटेनगरस्यैवजामात्रासहितोवणिक् ॥ आगतोबंधुवर्गैश्चवित्तैश्चबहुभिर्युतः ॥ २२ ॥

तें असें कीं, तुमचा पती साधुवाणी बहुत द्रव्य घेऊन जांवई व बंधुजनांसह नगराजवळ आला आहे ॥ २२ ॥

श्रुत्वादूतमुखाद्वाक्यंमहाहर्षवतीसती ॥ सत्यपूजांततःकृत्वाप्रोवाचतनुजांप्रति ॥ २३ ॥

असें त्या दूताचे तोंडचें भाषण ऐकून ती पतिव्रता स्त्री मोठी आनंदित होऊन तत्काळ सत्यनारायणाचें पूजन करून नंतर कन्येला ह्मणाली कीं, ॥ २३ ॥

व्रजामिशीघ्रमागच्छसाधुसंदर्शनाय च ॥ इतिमातृवचश्श्रुत्वाव्रतंकृत्वासमाप्यच ॥ २४ ॥

हे कन्ये ! मी साधूच्या दर्शनासाठीं जातें. तूंहि लवकर ये. असें मातुश्रीचें भाषण श्रवण करून त्या कन्येनें तेंच व्रत आरंभापासून समाप्तीपर्यंत यथाविधि केलें ॥ २४ ॥

प्रसादंचपरित्यज्यगतासाऽपिपतिंप्रति ॥ तेनरुष्टःसत्यदेवोभर्तारंतरणींतथा ॥ २५ ॥

परंतु त्या व्रतांत मुख्य विधि प्रसादभक्षण हा आहे. तो न करितां ती कन्या प्रसाद टाकून पतिदर्शनार्थ गेली, त्या कारणानें त्या कन्येवर सत्यदेव रुष्ट होऊन तिचा पति व नौका ॥ २५ ॥

संहृत्यचधनैःसार्धंजलेतस्याअमज्जयत् ॥ ततःकलावतीकन्यानविलोक्यनिजंपतिम् ॥२६॥

शोकेनमहतातत्ररुदतीचापतद्भुवि ॥ दृष्ट्वातथाविधांनावंकन्यांचबहुदुःखिताम् ॥ २७ ॥

द्रव्यासह पाण्यांत बुडतीं झालीं. नंतर कलावती कन्या आपला भर्ता कोठें दिसेनासा झाला असें अवलोकन करून मोठ्या शोकानें रुदन करीत तेथेंच भूमीवर पडली. तेव्हां तो साधुवाणी आपली कन्या बहुत दुःखित झाली असें अवलोकन करून ॥ २६ ॥ २७ ॥

भीतेनमनसासाधुःकिमाश्चर्यमिदंभवेत् ॥ चिंत्यमानाश्चतेसर्वेबभूवुस्तरिवाहकाः ॥ २८ ॥

ततोलीलावतीकन्यांदृष्ट्वासाविह्वलाऽभवत् ॥ विललापातिदुःखेनभर्तारंचेदमब्रवीत् ॥ २९ ॥

मनांत भयभीत होऊन हें काय आश्चर्य जाहलें असा विचार करूं लागला. त्याचप्रमाणें सर्व नावाडीही विचारांत पडले. नंतर ती लीलावती आपल्या कन्येस अवलोकन करून मोठ्या दुःखानें आक्रोश करून पतीस ह्मणाली कीं–॥ २८ ॥ २९ ॥

इदानींनौकयासार्धंकथंसोऽभूदलक्षितः ॥ नजानेकस्यदेवस्यहेलयाचैवसाहृता ॥३०॥

आतांच आपला जामात कारणावांचून नौकेसह कसा अदृश्य झाला ? तस्मात् कोणच्या तरी देवाच्या अवकृपेनें या कन्येस महत्दुःख प्राप्त झालें असावें. परंतु तें कारण मात्र मी जाणत नाहीं ॥ ३० ॥

सत्यदेवस्यमाहात्म्यंज्ञातुंवाकेनशक्यते ॥ इत्युक्त्वाविललापैवततश्चस्वजनैःसह ॥ ३१ ॥

आतां सत्यनारायणाचें माहात्म्य जाणण्याविषयीं कोण समर्थ आहे ! तेव्हां त्याचीच अवकृपा झाल्यामुळें असें झालें नसेलना ! असें भाषण करून आपल्या स्वजनांसहवर्तमान पुनः विलाप करिती झाली॥३१॥

ततोलीलावतीकन्यांक्रोडेकृत्वारुरोदह ॥ ततःकलावतीकन्यानष्टेस्वामिनिदुःखिताः ॥३२॥

पश्चात् ती लीलावती आपल्या कन्येला पोटाशीं धरून रुदन करूं लागली. नंतर त्या कलावती कन्येनें आपला पति नष्ट झाला ह्मणून दुःखित होऊन ॥ ३२ ॥

गृहीत्वापादुकेतस्यानुगंतुंचमनोदधे ॥ कन्यायाश्चरितंदृष्ट्वासभार्यःसज्जनोवणिक् ॥३३॥

त्या पतीच्या पादुका ग्रहण करून सहगमन करण्याविषयीं मनांत निश्चय केला. असें कन्येचें कृत्य अवलोकन करून तो सज्जन साधुवाणी स्त्रीसहवर्तमान ॥ ३३ ॥

अतिशोकेनसंतप्तश्चिंतयामासधर्मवित् ॥ हृतंवासत्यदेवेनभ्रांतोऽहंसत्यमायया ॥ ३४ ॥

अतिशोकानें विव्हल होऊन धर्मज्ञ असल्यामुळें विचार करूं लागला कीं--हें माझें सर्व ऐश्वर्य सत्यनारायणानें हरण केलें किंवा मीच त्या सत्यनारायणाच्या मायेनें मोहित झालों कांहींच कळत नाहीं ॥ ३४ ॥

सत्यपूजांकरिष्यामियथाविभवविस्तरैः ॥ इतिसर्वान्समाहूयकथयित्वामनोरथम् ॥ ३५ ॥

परंतु आपण या विषयीं सत्यनारायणाला नवस करावा; असें मनांत आणून सर्वांस बोलावून ह्मणाला कीं-हें माझें कार्य झालें असतां, आपल्या ऐश्वर्यानुरूप मी सत्यनारायणाचें पूजन करीन ॥ ३५ ॥

नत्वाचदंडवद्भूमौसत्यदेवंपुनःपुनः ॥ ततस्तुष्टःसत्यदेवोदीनानांपरिपालकः ॥ ३६ ॥

जगादवचनंचैनंकृपयाभक्तवत्सलः ॥ त्यक्त्वाप्रसादंतेकन्यापतिंद्रष्टुंसमागता ॥ ३७ ॥

असें बोलून सत्यनारायणाला पृथ्वीवर वारंवार दंडवत् नमस्कार करूं लागला, त्या काळीं दीनांचे पालक सत्यनारायण संतुष्ट होऊन भक्तांवर दया करणारे ह्मणून कृपेनें त्या साधुवाण्यास आकाशवाणीनें बोलिले कीं–हे साधो ! तुझी कन्या माझा प्रसाद टाकून पतिदर्शनार्थ आली ॥ ३६ ॥ ३७ ॥

अतोऽदृष्टोऽभवत्तस्याःकन्यकायाःपतिर्ध्रुवम् ॥ गृहंगत्वाप्रसादंचभुक्त्वाचायातिचेत्पुनः ॥३८॥

ह्मणून सांप्रत या कन्येचा पति अदृश्य जाहला आहे. याकरितां जर ही तुझी कन्या घरीं जाऊन प्रसाद भक्षण करून पुनः येईल ॥ ३८ ॥

लब्धभर्त्रीसुतासाधोभविष्यतिनसंशयः ॥ कन्यकातादृशंवाक्यंश्रुत्वागगनमंडलात् ॥ ३९ ॥

तर हे साधो ! हिचा भर्ता हिला मिळेल. असें त्या कन्येनें आकाशांतून निघालेलें भाषण ऐकून ॥ ३९ ॥

क्षिप्रंतदागृहंगत्वाप्रसादंचबुभोजसा ॥ सापश्चत्पुनरागत्यददर्शस्वजनंपतिम् ॥ ४० ॥

त्वरेनें घरीं जाऊन प्रसाद भक्षण केला आणि पुनः तेथें येऊन स्वजनांसहित पतीस पाहून ॥ ४० ॥

ततःकलावतीकन्याजगादपितरंप्रति ॥ इदानींचगृहंयाहिविलंबंकुरुषेकथम् ॥ ४१ ॥

आपल्या पित्यास ह्मणाली कीं—हे तात ! आतां आपल्या घरीं चला. उशीर कां करितां ? ॥ ४१ ॥

तच्छ्रुत्वाकन्यकावाक्यंसंतुष्टोऽभूद्वणिक्सुतः ॥ पूजनंसत्यदेवस्यकृत्वाविधिविधानतः ॥ ४२ ॥

असें तें कन्येचें भाषण ऐकून तो वणिक्पुत्र साधु संतुष्ट होऊन तत्काल यथाविधि त्या सत्यनारायणाची पूजा करिता झाला ॥ ४२ ॥

धनैर्बंधुगणैःसार्धंजगामनिजमंदिरम् ॥ पौर्णमास्यांचसंक्रांतौकृतवान्सत्यपूजनम् ॥ ४३ ॥

नंतर द्रव्य व बंधुजनांसहवर्तमान तो साधुवाणी आपल्या घरीं आला. नंतर प्रत्येक पौर्णिमा व संक्रांति या दोन दिवशीं सत्यनारायणाची पूजा करूं लागला ॥ ४३ ॥

इहलोकेसुखंभुक्त्वाचांतेसत्यपुरंययौ ॥ ४४ ॥

सूत ह्मणतात—हे शौनकादिक ऋषिहो ! या प्रकारें करून तो साधुवाणी व्रत करित असतां त्या व्रताच्या प्रभावानें तो इहलोकीं प्रपंचसुख भोगून अंतीं सत्यपुरनामक वैकुंठास गेला ॥ ४४ ॥

॥ इतिश्रीस्कंदपुराणेरेवाखंडेसत्यनारायणकथायांचतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

सू० ॥ अथान्यच्चप्रवक्ष्यामिश्रृणुध्वंमुनिसत्तमाः ॥ आसीदंगध्वजोराजाप्रजापालनतत्परः ॥ १ ॥

सूत शौनकादिक ऋषींस ह्मणतात—हे मुनिश्रेष्ठहो ! सत्यनारायणाचा प्रसाद टाकला ह्मणजे दुःख भोगावें लागतें, याविषयीं आणखी एक आख्यान मी सांगतों तें तुह्मीं श्रवण करावें. प्रजेचें पालन करण्याविषयीं तत्पर असा अंगध्वज या नामेंकरून एक प्रसिद्ध राजा होता ॥ १ ॥

प्रसादंसत्यदेवस्यत्यक्त्वादुःखमवापसः ॥ एकदासवनंगत्वाहत्वाबहुविधान्पशून् ॥ २ ॥

त्यानें सत्यनारायणाचा प्रसाद टाकिला ह्मणून त्यास दुःख भोगावें लागलें. तें असें कीं—कोणे एके काळीं तो अंगध्वजराजा मृगयेकरितां अरण्यांत जाऊन अनेक प्रकारचे हिंस्र पशू मारून ॥ २ ॥

आगत्यवटमूलंचदृष्ट्वासत्यस्यपूजनम् ॥ गोपाःकुर्वंतिसंतुष्टाभक्तियुक्ताःसबांधवाः ॥ ३ ॥

एका वटवृक्षाखालीं येऊन पहातो तों तेथें गोपाल आनंदानें आपल्या बंधुजनांसहवर्तमान भक्तिपूर्वक सत्यनारायणाची पूजा करीत आहेत ॥ ३ ॥

राजादृष्ट्वातुदर्पेणनगत्वाननमामसः ॥ ततोगोपगणाःसर्वेप्रसादंनृपसंनिधौ ॥ ४ ॥
संस्थाप्यपुनरागत्यभुक्त्वासर्वेयथेप्सितम् ॥ ततःप्रसादंसंत्यज्यराजादुःखमवापसः ॥ ५ ॥

असें पाहून तो राजा गर्वामुळें त्यांच्याजवळ गेला नाहीं व नमस्कारही केला नाहीं. नंतर त्या सर्व गोपाळांनीं सत्यनारायणाचा प्रसाद त्या राजाजवळ ठेवून ते पुनः पहिल्या ठिकाणीं येऊन सर्वांनीं प्रसाद भक्षण केला. नंतर राजानें प्रसाद टाकला ह्मणून त्यास दुःख प्राप्त झालें ॥ ४ ॥ ५ ॥

तस्यपुत्रशतंनष्टंधनधान्यादिकंचयत् ॥ सत्यदेवेनतत्सर्वंनाशितंममनिश्चितम् ॥ ६ ॥

तें असें कीं–त्याचे शंभर पुत्र व धनधान्यादिक जी संपत्ति होती त्या सर्वांचा नाश झाला; तेव्हां हा सर्व माझा नाश सत्यनारायणानेंच केला यांत संशय नाहीं ॥ ६ ॥

अतस्तत्रैवगच्छामियत्रदेवस्यपूजनम् ॥ मनसातुविनिश्चित्ययथौगोपालसन्निधौ ॥ ७ ॥

पूर्वीं पूजा झाली होती तेथेंच जावें असा मनानें निश्चय करून तो राजा गोपाळांजवळ गेला ॥ ७ ॥

ततोऽसौसत्यदेवस्यपूजांगोपगणैःसह ॥ भक्तिश्रद्धान्वितोभूत्वाचकारविधिनानृपः ॥ ८ ॥

नंतर सर्व गोपाळांसहवर्तमान त्या राजानें भक्ति आणि श्रद्धा यांनीं युक्त होऊन यथाविधि सत्यनारायणाची पूजा केली ॥ ८ ॥

सत्यदेवप्रसादेनधनपुत्रान्वितोभवत् ॥ इहलोकेसुखंभुक्त्वाचांतेसत्यपुरंययौ ॥ ९ ॥

नंतर त्या राजाला सत्यनारायणाच्या प्रसादानें पूर्वींची संतति व संपत्ति प्राप्त झाली आणि इहलोकीं प्रपंचसुख भोगून अंतीं वैकुंठास गेला ॥ ९ ॥

यइदंकुरुतेसत्यव्रतंपरमदुर्लभम् ॥ शृणोतिचकथापुण्यांभक्तियुक्तःफलप्रदाम् ॥ १० ॥

सूत ह्मणतात–हे शौनकादिक ऋषिहो ! असें परम दुर्लभ सत्यनारायणाचें व्रत जो कोणी भक्तिपूर्वक करितो आणि पुण्यकारक व फळदायक ही कथा श्रवण करितो ॥ १० ॥

धनधान्यादिकंतस्यभवेत्सत्यप्रसादतः ॥ दरिद्रोलभतेवित्तंबद्धोमुच्येतबंधनात् ॥ ११ ॥

तो सत्यनारायणाच्या प्रसादानें धनधान्यादिक इच्छित फळातें पावतो. तें असें कीं–जो दरिद्री असेल त्याला द्रव्य मिळेल, जो बंदींत पडला असेल तो बंधनापासून मुक्त होईल ॥ ११ ॥

भीतोभयात्प्रमुच्येतसत्यमेवनसंशयः ॥ इप्सितंचफलंभुक्त्वाचांतेसत्यपुरंव्रजेत् ॥ १२ ॥

तसेंच जो भयाभीत जाहला असेल तो निर्भय होतो. याप्रमाणें इहलोकीं इच्छित फळ भोगून अंतीं विष्णुलोकास जातो हें निःसंशय सत्य आहे ॥ १२ ॥

इतिवःकथितंविप्राःसत्यनारायणव्रतम् ॥ यत्कृत्वासर्वदुःखेभ्योमुक्तोभवतिमानवः ॥ १३ ॥

सूत ह्मणतात—हे शौनकादिक ऋषिहो ! याप्रकारें जें व्रत केलें असतां मानव सर्व दुःखांपासून मुक्त होतो तें हें सत्यनारायणाचें व्रत मी तुह्मांस कथन केलें ॥ १३ ॥

विशेषतःकलियुगेसत्यपूजाफलप्रदा ॥ केचित्कालंवदिष्यंतिसत्यमीशंतमेवच ॥ १४ ॥

सत्यनारायणंकेचित्सत्यदेवंतथापरे ॥ नानारूपधरोभूत्वासर्वेषामीप्सितप्रदः ॥ १५ ॥

आणि कलियुगांत सत्यनारायणाची पूजाच विशेषेंकरून फलप्रद आहे. हा नानाप्रकारचीं रूपें धारण करून सर्वांचें इच्छित पूर्ण करितो ह्मणून त्यालाच कोणी काल ह्मणतात, कोणी सत्य ह्मणतात, कोणी ईश ह्मणतात, कोणी सत्यनारायण ह्मणतात, व कोणी सत्यदेव ह्मणतात ॥ १४ ॥ १५ ॥

॥ आरती सत्यनारायणाची ॥

काशीक्षेत्रींप्रगटुनिदेसीद्विजराया ॥ वाजीहस्तीआणिरथधनसुतजाया ॥ प्रल्हादापरित्यावरिकेलीबहुमाया ॥ अंतींदिधलीत्यासीघननिलनिजकाया ॥ जयदेवजयदेवजयसत्येश्वरदेवा ॥ कलियुगींतत्क्षणिंपावनघेसीनिजसेवा ॥ जयदेव० ॥ १ ॥ नलगेज्योतिषशुद्धीशास्त्रादि[illegible]शुद्धी ॥ व्हा[illegible]ब्धीज्या[illegible]पनिबद्धी ॥ इच्छितजेंतेंदेसीमनुजाफलसिद्धी ॥ ता[illegible]कोटींमध्यें[illegible]द्धी ॥ जय[illegible]० ॥ [illegible] ॥ साधूसामकवाणी बोलेनिजराणी ॥ देवाव्हावीमजलासंततिचीखाणी ॥ पूजिननंतरमीतोहारीवरषोनी ॥ ऐसेंमानासिनियमितसोडीतोपाणी ॥ जयदे० ॥ ३ ॥ ऐसातोहीसाधुदेउनिमनकामा ॥ शेवटिंगेलादेवाराविकोटीधामा ॥ थकलातोहीशेषवर्णितांमहिमा ॥ तेथेंथकलीजिव्हाघेतांतवनामा ॥ जयदेव० ॥ ४ ॥ अमृतकृष्णामतिनेंकेलीहीआर्ती ॥ मजलानाहींबुद्धिस्तवनाचीस्फूर्ती ॥ हृदयींबैसोदेवाकोमलतीमूर्ती ॥ दीनोद्धारादेवात्रिभुवनिंत्वत्कीर्ती ॥ जयदेव० ॥ ५ ॥ आरती समाप्त ॥

भविष्यतिकलौसत्यव्रतरूपीसनातनः ॥ यइदंपठतेनित्यंशृणोति
मुनिसत्तमाः ॥ सत्यंनश्यन्तिपापानिसत्यदेवप्रसादतः ॥ १६ ॥

परंतु हा पुराणपुरुष भगवान् या कलियुगांत सत्यनारायण व्रताच्या रूपेंकरून प्रगट होईल, याकरितां हे शौनकादिक मुनिश्रेष्ठहो ! हें त्याचें आख्यान जो कोणी श्रवण किंवा पठण करितो त्याचीं संपूर्ण पातकें त्या सत्यनारायण[illegible]च्या प्रसादेंकरून तुम्हांस [illegible] प्राप्त पावतात हें स[illegible] आहे ॥ १६ ॥

[illegible] सत्यनारायणकथायां पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥

[illegible] हरयेनमः हरयेनमः ॥

```
[OrderDescription]
,CREATED=16.09.19 10:23
,TRANSFERRED=2019/09/16 at 10:32:56
,PAGES=23
,TYPE=STD
,NAME=S0001796
,Book Name=M-2228-SHRI SATYANARAYAN PUJA SARTH KATHA
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,
```